मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पीसीएमसीमध्ये मराठी कर्मचाऱ्यांना विशेष वेतनवाढ

## विधी समितीचा महत्त्वपूर्ण निर्णय; एम.ए. मराठी उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना दोन वेतनवाढीचा प्रस्ताव




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या दैनंदिन कामकाजामध्ये मराठी भाषेचा वापर व्हावा. महापालिकेचा व्यवहार अधिक सोपा, सुटसुटीत व अर्थपूर्ण भाषेत व्हावा, या उद्देशाने एम. ए. मराठी उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना दोन विशेष वेतनवाढ देण्याचा ठराव विधी समितीच्या विशेष बैठकीत करण्यात आला आहे. ता ठराव अंतिम मंजुरीसाठी महापालिका सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात येणार आहे

पिंपरी-चिंचवड महापालिकाच्या कामकाजात मराठीचा वापर वाढवण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. एम.ए. मराठी उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना दोन विशेष वेतनवाढ देण्याचा ठराव विधी समितीत मंजूर झाला. हा ठराव अंतिम मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेसमोर ठेवला जाणार आहे. सभापती सुजाता बोराटे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. मराठी भाषा अधिक सोपी, सुटसुटीत आणि सर्वसामान्यांना समजेल अशी व्हावी, तसेच तिचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

विधी समितीची बैठक सभापती सुजाता बोराटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीला समितीचे सदस्य ज्ञानेश्वर जगताप, कुशाग्र कदम, वर्षा जगताप, तुषार सहाणे, कुंदा भिसे, शेखर चिंचवडे, सहआयुक्त मनोज लोणकर, उपायुक्त राजेश आगळे आदी उपस्थित होते.

मराठी भाषेला नवतंत्रज्ञानाने सुसज्ज करणे, सर्वसामान्यांना समजेल अशी प्रशासकीय मराठी विकसित करणे. बोली भाषांचे जतन व संवर्धन करणे, या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी शासनामार्फत विविध शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने विधी समितीने एम.ए. मराठी उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना दोन विशेष वेतनवाढ देण्याचा ठराव केला आहे.

### महापालिकेत मराठीला प्रोत्साहन

» पिंपरी-चिंचवड महापालिकाच्या कामकाजात मराठीचा वापर वाढवण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. एम.ए. मराठी उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना दोन विशेष वेतनवाढ देण्याचा ठराव विधी समितीत मंजूर झाला. हा ठराव अंतिम मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेसमोर ठेवला जाणार आहे. सभापती सुजाता बोराटे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. मराठी भाषा अधिक सोपी, सुटसुटीत आणि सर्वसामान्यांना समजेल अशी व्हावी, तसेच तिचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

# सव्वा दोन लाखांचा भेसळयुक्त मँगो पल्प जप्त;अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

## उन्हाळ्यात वाढत्या भेसळीवर आळा; मावळ-खेडमध्ये अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई




**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने पुणे जिल्ह्यात कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत मावळ आणि खेड तालुक्यांमध्ये केलेल्या कारवायांमध्ये २ लाख २३ हजार १९६ रुपये किमतीचा भेसळयुक्त मँगो पल्प आणि त्यासाठी वापरले जाणारे हानिकारक पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

प्रशासनाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, पथकाने मावळ तालुक्यातील उर्से येथील मोहम्मद एकरामुल उर्फ अक्रम गुलाम या आस्थापनेवर छापा टाकला. या ठिकाणी कोणताही परवाना नसताना आणि धोकादायक रंग व इतर पदार्थांचा वापर करून मँगो पल्प तयार केला जात असल्याचे उघड झाले. तपासणी दरम्यान मँगो पल्प, मँगो फ्रूट आणि पल्प तयार करण्यासाठी वापरली जाणारी साखर, गायीचे दूध व केशर कलर लिक्वीड सोल्युशन यांसारखे भेसळकारी पदार्थ आढळून आले. अन्न व औषध प्रशासन विभागाने या पदार्थांचे सहा नमुने तपासणीसाठी घेतले. उर्वरित एक लाख ६१ हजार ८१६ रुपये किमतीचा ३२८२९ किलो साठा जप्त करून नष्ट करण्यात आला आहे.

मावळमधील उत्पादकाने हा साठा खेड तालुक्यातील राजगुरुनगर येथील अविष्कार एन्टरप्रायझेसला पुरवल्याचे तपासात समोर आले. प्रशासनाने तातडीने या ठिकाणचीही तपासणी केली आणि तेथून ६१ हजार ३८० रुपये किमतीचा ५५८ किलो मँगो पल्प जप्त केला. ही कारवाई अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त श्रीधर डुबे पाटील आणि सह आयुक्त डी. व्ही. भोगावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त एन आर सरकटे, अन्न सुरक्षा अधिकारी बी. ए. शिंदे, एस. डी. मस्के, पी. एस. कच्छवे, सतिश हाके यांनी केली.

> उन्हाळी मोहिमेदरम्यान विक्री होणाऱ्या अन्न पदार्थांमध्ये भेसळीचा संशय आल्यास नागरिकांनी प्रशासनाला तात्काळ माहिती द्यावी. कोणत्याही फळ विक्री किंवा ज्युस उत्पादकांनी विना परवाना व्यवसाय करू नये. अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ नुसार विना परवाना व्यवसाय केल्यास १० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.
> - डी. व्ही. भोगावडे, सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, पुणे.

# शहरात पाणीकपात नाही; महापालिका आयुक्तांची माहिती

## पिंपरी-चिंचवड शहरात दिवसाआड समन्यायिक पद्धतीने पाणीपुरवठा त्यामुळे आणखी पाणीकपात करण्यात येणार नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात दिवसाआड समन्यायिक पद्धतीने पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे आणखी पाणीकपात करण्यात येणार नाही, असे महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले. यंदा पाऊस सरासरीपेक्षा कमी होण्याची शक्यता असल्याने पिंपरी-चिंचवड व पुणे महापालिका हद्दीत पुढील काही महिने 15 टक्के पाणीकपात करण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवड व पुणे शहरासाठी 31 जुलैपर्यंत पिण्यासाठी पाणी राखीव ठेवले जाते. यावर्षी पाऊस कमी असल्याने जलसंपदा मंत्र्यांच्या सूचनेवरून 31 ऑगस्टपर्यंत पाणी राखीव ठेवण्यात येणार आहे. पाणीकपातीमुळे वाचलेले पाणी शहरवासीयांना पुढील काही महिन्यांत वापरता येणार आहे. पाणीकपात करण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे. त्या संदर्भात विचारले असता आयुक्त बोलत होते.

आयुक्त सूर्यवंशी म्हणाले की, गेल्या सव्वासहा वर्षांपासून पिंपरी-चिंचवड शहरात दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. सध्या पवना धरणातून तसेच, आंद्रा धरणातील इंद्रायणी नदीच्या निघोजे बंधाऱ्यातून पाणी उचलले जात आहे. जलसंपदा विभागाच्या सूचनेपूर्वीच शहरात पाणीकपात सुरूच आहे. त्यामुळे नव्याने पाणीकपात केली जाणार नाही.

महापालिकेकडून घेतले जाणारे पाणी प्रक्रिया करून नदी पात्रात सोडले जात नसल्याने जलसंपदा विभागाने महापालिकेस दंड लावला आहे. याप्रकारे त्यांनी राज्यातील अनेक महापालिकांना दंड लावला आहे. पाणी शुल्क व दंडाची रक्कम भरण्याची कार्यवाही केली जात आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.



### नियमभंगावर दंड; अतिक्रमणांवर कारवाई

» महापालिकेकडून पाणी प्रक्रिया करून नदीपात्रात सोडण्याबाबत नियमांचे पालन न केल्याने दंड ठोठावण्यात आला आहे. संबंधित शुल्क व दंड भरण्याची कार्यवाही सुरू असल्याचे प्रशासनाने सांगितले. तसेच शहरातील अनधिकृत बांधकामे, पत्राशेड व अतिक्रमणांवर नियमित कारवाई करण्याचे नियोजनही करण्यात आले आहे.

### नव्या कपातीला नकार

» पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात सध्या दिवसाआड समन्यायिक पद्धतीने पाणीपुरवठा सुरू असून नव्याने पाणीकपात केली जाणार नसल्याची माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली. पवना धरण तसेच आंद्रा धरणातून शहरासाठी पाणीपुरवठा केला जात आहे. जलसंपदा विभागाच्या सूचनेपूर्वीच शहरात कपात सुरू असल्याने अतिरिक्त कपात टाळण्यात आली आहे. नागरिकांना उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

### पाणी साठा ३१ ऑगस्टपर्यंत राखीव

» यंदा पाऊस कमी होण्याची शक्यता लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड व पुणे शहरासाठी पिण्याचे पाणी ३१ जुलैऐवजी ३१ ऑगस्टपर्यंत राखीव ठेवण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे. १५ टक्के पाणीकपात लागू करण्यात आली असून त्यातून वाचलेले पाणी पुढील काही महिन्यांत उपयोगात आणले जाणार आहे.

---

# आकुर्डी म्हाळसाकांत चौकात सिग्नल बंद; वाहतूक कोंडीने नागरिक हैराण

## दोन दिवसांपासून यंत्रणा ठप्प; अपघाताचा धोका वाढला, तातडीच्या उपाययोजनेची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

म्हाळसाकांत चौकातील स्वयंचलित सिग्नल यंत्रणा दोन दिवसांपासून बंद आहे. या चौकातील सिग्नल यंत्रणा बंद झाल्यानंतर वाहतूक विभागाने येथे पोलिस नियुक्त करणे गरजेचे होते. परंतु दोन दिवसांपासून ना सिग्नल यंत्रणा पूर्ववत केली ना वाहतूक पोलिस नियुक्त केला. यामुळे चौकात वाहतूक कोंडी होत असून लहान मोठे अपघात घडत आहेत. यामुळे संबंधित विभागाने येथील सिग्नल यंत्रणा त्वरित पूर्ववत करावी, अशी मागणी होत आहे.

वाहतूक नियंत्रण करणारी सिग्नल व्यवस्था सलग दोन दिवसांपासून बंद असल्याने आकुर्डी, निगडी, चिंचवड या भागांना जोडणारा मध्यवर्ती ठिकाणचा चौक म्हणून म्हाळसाकांत चौक ओळखला जातो. या चौकात सातत्याने चारही बाजूने वाहनांची गर्दी असते. जवळच म्हाळसाकांत विद्यालय, प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, सीएमएस विद्यालय, सरस्वती विद्यालय, गुरुगणेश विद्यालय असे अनेक शाळा, महाविद्यालये असून, या ठिकाणी सातत्याने विद्यार्थ्यांची व पालकांची ये-जा सुरू असते. त्याचबरोबर शाळा सुटते वेळी व भरतीवेळी मोठ्या प्रमाणात पालक- विद्यार्थी, खासगी वाहने, विद्यार्थी वाहतूक बस यांची गर्दी असते.

म्हाळसाकांत चौकातून निगडी, आकुर्डी रेल्वे स्टेशन, चिंचवड, आकुर्डी गावठाण या ठिकाणी जाण्यासाठी या चौकाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. गेले शनिवार आणि रविवार शाळा, महाविद्यालयांना सुट्टी असल्याकारणाने वाहतूक कोंडी काहीशी नियंत्रणात होती. मात्र, हीच परिस्थिती सोमवारी राहिली तर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागेल. यासाठी वेळीच उपाययोजना करून वाहतूक विभाग व महापालिका प्रशासनाने कार्यवाही करून स्वयंचलित वाहतूक यंत्रणा सुरळीत करावी, अशी मागणी ज्येष्ठ नागरिक व स्थानिक वाहनचालकाकडून होत आहे.



### चौकात कोंडीची समस्या

» म्हाळसाकांत चौक येथे स्वयंचलित सिग्नल यंत्रणा गेल्या दोन दिवसांपासून बंद असल्याने वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. चौकात चारही बाजूंनी वाहनांची सतत वर्दळ असते. सिग्नल बंद असूनही वाहतूक पोलिसांची नेमणूक करण्यात आलेली नाही. परिणामी वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या परिसरात अपघातांची शक्यता वाढली असून नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

### तातडीने उपाययोजनेची मागणी

» म्हाळसाकांत चौक परिसरात शाळा व महाविद्यालये मोठ्या संख्येने असल्याने विद्यार्थ्यांची व पालकांची सतत ये-जा सुरू असते. शाळा सुटण्याच्या वेळेत मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढते. सिग्नल बंद असल्यामुळे ही परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. प्रशासनाने तातडीने सिग्नल दुरुस्त करून वाहतूक सुरळीत करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाला वेग! आयुक्तांनी केली पाहणी

## पहिल्या टप्प्यात 52 हजार चौ.मी. क्षेत्राचे संपादन होणार; 129 मिळकतदारांना मिळणार मोबदला

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरण प्रकल्पाची महापालिका आयुक्तांनी रविवारी पाहणी केली आहे. यासाठी भूसंपादनासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, पहिल्या टप्प्याचे काम जवळपास पूर्ण झाल्याचा दावा महापालिकेकडून करण्यात आला आहे. शहरातील दोन राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा हा रस्ता आहे. या पाहणीवेळी अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, भूसंपादन विभाग प्रमुख निखील मोरे, उपायुक्त शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर, पथ विभागाचे मुख्य अभियंता बनकर आदी उपस्थित होते.

सात एप्रिलपासून जागेवर बॉण्ड्री मार्किंग तसेच फळझाडे आणि इतर झाडांची मोजणी करण्याचे काम विविध विभागांच्या समन्वयातून सुरू करण्यात आले आहे. एकूण ३.५ किमी लांबीच्या रस्त्यासाठी हे काम सुरू आहे. पहिल्या टप्प्यात १२९ मिळकतींमधील सुमारे ५२,६३० चौ.मी. क्षेत्राचे भू-संपादन केले जाणार आहे, असे महापालिकेकडून सांगण्यात आले.

यासाठी महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त समिती स्थापन करण्यात आली असून, भू-संपादन प्रक्रियेचा नियमित आढावा घेतला जात आहे. अंतिम निवाडा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून, लवकरच मंजुरी अपेक्षित आहे, असे आयुक्तांनी सांगितले. कात्रज-कोंढवा रस्ता हा शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा रस्ता आहे. या प्रकल्पासाठी भू-संपादन प्रक्रिया गतीने पूर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासन आणि जिल्हा प्रशासन समन्वयाने काम करीत आहेत.

नागरिकांना सुलभ आणि सुरक्षित वाहतूक सुविधा देणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे, या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होण्याला मदत होईल, असे आयुक्तांनी नमूद केले. भू-संपादन प्रक्रियेत पारदर्शकता आणि गती यांना प्राधान्य देत, संबंधित सर्व प्रशासकीय टप्पे वेळेत पूर्ण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. भूसंपादन पूर्ण करून प्रकल्पाला गती देण्यात येईल, असे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले.



### वाहतूक कोंडीला दिलासा

» कात्रज-कोंढवा रस्ता शहरातील दोन राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग असल्याने या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. नागरिकांना सुरक्षित व सुलभ प्रवास सुविधा देणे हे प्रशासनाचे उद्दिष्ट असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. तसेच भूसंपादन पूर्ण करून प्रकल्पाला गती देण्याचा निर्धार जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी व्यक्त केला.

### कामाला गती देण्याच्या सूचना

» कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरण प्रकल्पाची महापालिका आयुक्तांनी पाहणी करून कामाला गती देण्याच्या सूचना दिल्या. सुमारे ३.५ किमी लांबीच्या या महत्त्वाच्या रस्त्यासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू असून, पहिल्या टप्प्यात १२९ मिळकतींमधील सुमारे ५२,६३० चौ.मी. क्षेत्र अधिग्रहित केले जाणार आहे. बॉण्ड्री मार्किंग आणि झाडांची मोजणी सुरू करण्यात आली असून विविध विभागांच्या समन्वयातून काम पुढे नेले जात आहे.

### प्रशासनाचा समन्वय

» या प्रकल्पासाठी महापालिका आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त समितीमार्फत नियमित आढावा घेतला जात आहे. अंतिम निवाडा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला असून लवकरच निर्णय अपेक्षित आहे. भूसंपादन प्रक्रियेत पारदर्शकता राखत सर्व टप्पे वेळेत पूर्ण करण्यावर प्रशासनाचा भर आहे.

# बेकायदा बांधकाम करणाऱ्यांचे दणाणले धाबे; पालिकेचा प्रशासनाचा उंड्री, औताडे-हांडेवाडी परिसरात दणका

## अनधिकृत रेडिमिक्स काँक्रीट प्रकल्पांवर प्रशासनाने कडक कारवाई,सात अनधिकृत रेडिमिक्स काँक्रीट प्रकल्पांवर फिरवला हातोडा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाने शहराच्या उपनगरांमधील अनधिकृत बांधकामांविरोधात आपली मोहीम अधिक तीव्र केली आहे. हवेली तालुक्यातील उंड्री, औताडे आणि हांडेवाडी परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर फोफावलेल्या अनधिकृत रेडिमिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पांवर प्रशासनाने कडक कारवाई केली. या धडक मोहिमेमध्ये सुमारे २७ हजार ३०० चौरस फूट क्षेत्रावरील नियमबाह्य बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली

गेल्या काही महिन्यांपासून उंड्री आणि आसपासच्या परिसरात विनापरवाना आरएमसी प्लांट उभारले जात असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे प्राप्त होत होत्या. या तक्रारींची दखल घेत बांधकाम विकास विभाग, परिमंडळ-१ च्या वतीने प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीत असे आढळून आले की, अनेक प्रकल्पधारकांनी नागरी सुविधांचे नियम धाब्यावर बसवून आणि महापालिकेची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता मोठमोठी शेड, यंत्रसामग्रीसाठीची काँक्रीट बांधकामे आणि लोखंडी सांगाडे उभारले होते. या अनधिकृत बांधकामांना कोणत्याही प्रकारची कायदेशीर मान्यता नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर प्रशासनाने ही धडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला.

सकाळी १० वाजल्यापासून सुरू झालेली ही मोहीम सायंकाळपर्यंत अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने राबवण्यात आली. या कारवाईसाठी महापालिकेने दोन जेसीबी यंत्रे आणि मोठ्या प्रमाणावर मजुरांचे पथक तैनात केले होते. एकूण ७ मोठ्या आरएमसी प्रकल्पांमधील अनधिकृत शेड, कार्यालयांचे बांधकाम आणि यंत्रसामग्रीसाठी उभारलेले पायाभूत सांगाडे पाडण्यात आले. २७ हजार ३०० चौरस फुटांचे हे प्रचंड क्षेत्र रिकामे करताना महापालिकेच्या पथकाने कोणाचीही गय केली नाही.



### फक्त पाडकाम नाही कायदेशील कारवाईदेखील

» केवळ बांधकाम पाडून महापालिका थांबलेली नाही, तर या प्रकल्पांच्या मुळावर घाव घालण्यासाठी पुढील कायदेशीर पावले उचलली आहेत. या अनधिकृत प्रकल्पांना मिळणारा वीजपुरवठा खंडित करण्यासाठी 'महावितरण'ला पत्र देण्यात आले आहे. तसेच, या प्रकल्पांमुळे होणारे वायू आणि जलप्रदूषण लक्षात घेता, त्यांच्यावर कठोर दंडात्मक कारवाई करण्यासाठी 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा'ला कळवण्यात आले आहे.

### नियम धाब्यावर बसवणाऱ्यांवर कारवाई

» पुणे महापालिकेने या कारवाईच्या माध्यमातून सर्व प्रकल्पधारकांना स्पष्ट इशारा दिला आहे. कोणताही आरएमसी प्लांट सुरू करण्यापूर्वी पुणे महापालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महावितरण या तिन्ही संस्थांच्या आवश्यक परवानग्या घेणे बंधनकारक आहे. जे प्रकल्पधारक नियम धाब्यावर बसवून बांधकाम करतील, त्यांच्यावर यापुढेही अशीच कठोर कारवाई केली जाईल. अनधिकृत प्लांट केवळ पाडले जाणार नाहीत, तर संबंधित मालकांवर फौजदारी गुन्हे आणि दंडात्मक कारवाई देखील केली जाईल.

# 'वारकरी साहित्य संमेलन' सुरु करण्याची घोषणा

## मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांची घोषणा; वारकरी परंपरेला शासनाचा नवा मंच

**पुणे | प्रतिनिधी**

'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बाल साहित्य संमेलन, महिला साहित्य संमेलन अशी अनेक संमेलने आपण बघतो. पण या वर्षापासून 'वारकरी साहित्य संमेलन' देखील महाराष्ट्र शासनाच्या वतीने सुरु केले जाईल,' अशी घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी रविवारी केली, तसेच 'वारकरी संप्रदायाची परंपरा आबालवृद्ध जपत असल्यामुळे समाजात धर्मांध शक्तींना थारा मिळणार नाही,' असेही सामंत यांनी म्हटले.

संत विचार प्रबोधिनी आणि डॉ. रामचंद्र देखणे साहित्य-कला प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित डॉ. रामचंद्र देखणे स्मृती पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भावार्थ देखणे, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप, पुरुषोत्तम पाटील, सचिन इटकर आदी उपस्थित होते.




### पुरस्कार वितरण

» कार्यक्रमात कीर्तन सेवा पुरस्कार केशव महाराज नामदास यांना, तर लोककला सेवा पुरस्कार चंदाताई तिवाडी यांना प्रदान करण्यात आला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी वारकरी परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्याची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

यंदाचा कीर्तन सेवा पुरस्कार संत नामदेव महाराज यांचे वंशज केशव महाराज नामदास आणि लोककला सेवा पुरस्कार भारुडसम्राज्ञी चंदाताई तिवाडी यांना प्रदान करण्यात आला.

सामंत म्हणाले, 'वारकरी संप्रदायाने संस्कृती जपण्याचे मोठे कार्य केले आहे. जो जो शब्द वारकरी संप्रदायाला दिला, तो मी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. संप्रदायातील मागण्या पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, वारकरी आणि राजकारणी एकत्र आल्यास अनेक प्रश्न मार्गी लागू शकतात. पण राजकारण्यांनी कीर्तनकारांकडून नम्रता, आत्मीयता आणि कठोरता घेतली पाहिजे.'

मोरे म्हणाले, 'भारुडामुळे वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान तळागाळापर्यंत पोहोचले. ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी लिहिली, नामदेवरायांनी कीर्तने केली आणि मराठी लोकांपर्यंत तत्त्वज्ञान गेले. भारुडामधून आणखी लोकांपर्यंत वारकरी संप्रदाय घेऊन जाण्याचे काम हे एकनाथ महाराजांनी केले. सामान्य माणसाला कळेल, त्यासाठी त्यांनी भारुड नावाचा प्रयोग सुरु केला. लोकांना हसता हसता परमार्थ सांगितला.' डॉ. भावार्थ देखणे यांनी प्रास्ताविक केले. केशव महाराज नामदास आणि चंदाताई तिवाडी यांनी मनोगत व्यक्त केले.

### 'वारकरी साहित्य संमेलन'

» मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'वारकरी साहित्य संमेलन' सुरू करण्याची घोषणा केली. वारकरी संप्रदायाने संस्कृती जपण्याचे मोठे कार्य केले असून समाजात सकारात्मक मूल्यांची जपणूक केली आहे. त्यामुळे या परंपरेला अधिक बळ देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. वारकरी आणि शासन एकत्र आल्यास अनेक प्रश्न मार्गी लागू शकतात, असेही त्यांनी नमूद केले.

### विविध माध्यमांतून समाजप्रबोधन

» संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव स्पष्ट केला. ज्ञानेश्वर, नामदेव आणि एकनाथ महाराजांनी विविध माध्यमांतून समाजप्रबोधन केले. विशेषतः भारुडाच्या माध्यमातून सामान्य माणसापर्यंत तत्त्वज्ञान पोहोचले. लोकांना सहज समजेल अशा पद्धतीने अध्यात्म सांगण्याची परंपरा वारकरी संप्रदायाने जपली, असे त्यांनी सांगितले.

> 'जीवनाचे कठीण तत्त्वज्ञान सोप्या शब्दांत मांडण्याचे काम हे कीर्तनकार आणि भारूडकार करत असतात. ज्ञानेश्वरी अगोदर कळत नाही म्हणून वाचत गेलो, मग कळतेय म्हणून वाचत गेलो, मग भाषणांसाठी ज्ञानेश्वरीचा आधार मला मिळाला. त्यामुळे प्रत्यक्ष जरी वारी, वारकरी, पायी चालत जाणे हे जरी होत नसले तरी आज ह्या सगळ्यांना समर्थन म्हणून, जे जे करावे लागेल ते करतो..
> - चंद्रकांत पाटील, मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण

# पुण्यातील धक्कादायक प्रकार; निरीक्षण गृहातून 12 बांगलादेशी महिला पसार

## 20 दिवसानंतर या प्रकाराला वाचा फुटली असून, बांगलादेशी महिलांचा शोध सुरु असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**पुणे | प्रतिनिधी**

बेकायदा वास्तव्य, तसेच वेश्याव्यवसाय प्रकरणात ताब्यात घेतलेल्या बांगलादेशी महिलांच्या सुरक्षेसाठी निर्माण केलेल्या हडपसर येथील एका संस्थेच्या निरीक्षण गृहातून १२ बांगलादेशी महिला पसार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. निरीक्षण गृहातील कर्मचारी (केअर टेकर) महिलेला बांधून बांगलादेशी महिला पसार झाला. २० दिवसानंतर या प्रकाराला वाचा फुटली असून, बांगलादेशी महिलांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.




### घटनाक्रम

» पुण्यातील हडपसर परिसरातील निरीक्षण गृहातून १२ बांगलादेशी महिला पसार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या महिलांना बेकायदा वास्तव्य व वेश्याव्यवसाय प्रकरणात विविध पोलिस ठाण्यांनी ताब्यात घेतले होते. न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांना मायदेशी पाठविण्याची प्रक्रिया सुरू असताना २३ मार्च रोजी त्यांनी पलायन केल्याची माहिती समोर आली.

हडपसर भागातील ससाणे वस्ती परिसरात एका संस्थेकडून निरीक्षण गृह चालविण्यात येते. निरीक्षण गृहात वेगवेगळ्या प्रकरणातील पीडित महिलांना न्यायालयाच्या आदेशाने पाठविण्यात येते. फरासखाना, दिघी, जेजूरी, देहूरोड, कोंढवा पोलिसांनी वेगवेगळ्या कारवाईत बांगलादेशी महिलांना ताब्यात घेतले होते. ताब्यात घेतलेल्या महिला वेश्याव्यवसायात गुंतलेल्या होत्या. त्यांना वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले होते. न्यायालयाने १८ मार्च रोजी बांगलादेशी महिलांना बांगलादेशात पाठविण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर बांगलादेशी दूतावासाशी संपर्क साधून त्यांना मायदेशी परत पाठविण्याची तयारी सुरु करण्यात आली होती. न्यायालयाने महिलांची रवानगी निरीक्षण गृहात करण्याचे आदेश दिले होते.

२३ मार्च रोजी एका बांगलादेशी महिलेने पोटदुखीचा बहाणा करुन कर्मचारी महिलेला बोलाविले. त्यानंतर तिच्याबरोबर असलेल्या अन्य महिलांनी निरीक्षण गृहातील कर्मचारी महिलेचे हात पाय बांधले. निरीक्षण गृहातून त्या पसार झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. बांगलादेशी महिला पसार झाल्याची माहिती संबंधित पोलीस ठाण्यांना कळविण्यात आली. निरीक्षण गृहात पोलिसांनी सुरक्षाव्यवस्था पुरवावी, अशी मागणी संबंधित संस्थेने केली होती.